**ठळक बातम्या**

- ऑपरेशन महादेव आणि ऑपरेशन सिंदूरमधून भारतानं दहशतवादी हल्ल्यांना अचूक, सडेतोड प्रत्युत्तर दिल्याचं अमित शहा यांचं प्रतिपादन

- ऑपरेशन सिंदूर थांबवण्यात कुठल्याही देशानं मध्यस्थी केली नसल्याचा सरकारचा राज्यसभेत पुनरुच्चार

- नासासोबतच्या इस्रोच्या निसार उपग्रहाचं श्रीहरीकोटाहून यशस्वी उड्डाण

**आणि**

- भारतातून आयात केलेल्या वस्तूंवर २५ टक्के कर लादण्याचा अमेरिकेचा निर्णय

**<><><><><>**

ऑपरेशन महादेव आणि ऑपरेशन सिंदूरमधून भारतानं दहशतवादी हल्ल्यांना अचूक, सडेतोड आणि त्वरित प्रत्युत्तर दिलं, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेत केलं. ऑपरेशन सिंदूरवरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. पहलगाम हल्ल्यात लष्कर-ए-तैय्यबा या दहशतवादी संघटनेचा हात असून हे दहशतवादी पाठवणाऱ्यांना आणि खुद्द त्या दहशतवाद्यांनाही आपण संपवलं. ऑपरेशन महादेवअंतर्गत पहलगाम दहशतवादी हल्ल्यात सामील असलेल्या सुलेमान, अफगाण आणि जिब्रान या लष्कर-ए-तैय्यबाच्या दहशतवाद्यांना सशस्त्र दलांनी ठार केलं, तर ऑपरेशन सिंदूरमध्ये लष्कर-ए-तैय्यबाचं मुख्यालय उद्ध्वस्त केलं, याचा पुनरुच्चार शहा यांनी केला.

**होल्ड... बाइट- अमित शहा**

तत्पूर्वी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कुठे आहेत, असा प्रश्न उपस्थित करून विरोधकांनी सभागृहात जोरदार घोषणाबाजी केली आणि प्रधानमंत्र्यांनी उत्तर द्यावं अशी मागणी केली. त्यानंतर विरोधकांनी सभात्याग केला.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर थांबवण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याचा दावा परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी फेटाळून लावला. ते आज राज्यसभेत ऑपरेशन सिंदूरवरच्या चर्चेदरम्यान बोलत होते. युद्ध थांबवण्यासाठी जगातल्या कोणत्याही नेत्यानं मध्यस्थी केली नाही, अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्षांशी दूरध्वनीवर बोलताना पाकिस्तानने हल्ला केला तर भारत प्रतिहल्ला करेल असं भारतानं स्पष्ट केलं होतं, असं जयशंकर म्हणाले. भारतीय सैन्याच्या हल्ल्यात पाकिस्तानातील मुरीदके आणि बहावलपूर ही दहशतवादी तळं उद्ध्वस्त झाली, सैन्यदलाच्या कामगिरीचा सर्वांना अभिमान आहे, असं जयशंकर म्हणाले.

भारतानं गेल्या दशकभरात दहशतवादाचा मुद्दा जागतिक मंचांवर यशस्वीपणे ठेवला, भारत कुण्याही तिसऱ्या देशाचा हस्तक्षेप स्वीकारणार नाही आणि अणुबॉम्बच्या धमकीला घाबरणार नाही, हा स्पष्ट संदेश ऑपरेशन सिंदूरद्वारे दिल्याचं जयशंकर यांनी सांगितलं.

पहलगाम हल्ल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यानी जम्मू काश्मीरला भेट दिली, तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपला सौदी अरेबियाचा दौरा सोडून परत आल्याचं केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी नमूद केलं. यातून सरकार या मुद्द्यावर किती संवेदनशील आहे, हे दिसतं असं नड्डा म्हणाले. नड्डा यांनी ऑपरेशन सिंदूरमधे सैन्यदलानं केलेल्या कामगिरीचं कौतुक केलं. तसंच देशात दहशतवादी कारवायांमधे आधीच्या तुलनेत घट झाल्याचं स्पष्ट केलं.

**होल्ड बाईट-नड्डा**

माजी मुख्यमंत्री आणि भाजपा खासदार अशोक चव्हाण यांनी चर्चेत भाग घेताना विरोधी पक्षांवर टीका केली.

**होल्ड - अशोक चव्हाण बाइट**

पहलगाममधे २६ लोकांची हत्या कशी झाली हे अजूनही गृहमंत्रालय सांगू शकलं नाही, पहलगाम हल्ल्याची जबाबदारी केंद्रीय गृहमंत्र्यांनी घ्यायला हवी, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत राज्यसभेत बोलताना म्हणाले. या चर्चेत द्रमुकचे एन आर एलांगो, तृणमूल कॉंग्रेसच्या डोला सेन, समाजवादी पक्षाच्या जया बच्चन, राजदचे मनोज झा, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या फौजिया खान यांनीही सहभाग घेतला.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केल्यामुळे ४००हून अधिक यूआरएल बंद करण्यात आल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात सांगितलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या संचार साथी या उपक्रमाच्या मदतीने १ कोटी ३६ लाख बनावट मोबाईल जोडणी बंद केल्याचं दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी लोकसभेत पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना सांगितलं. संचार साथी या पोर्टलवर ३५ लाखांहून अधिक मोबाईल चोरीच्या तक्रारी दाखल झाल्या होत्या, त्यापैकी २१ लाखांहून अधिक मोबाईल शोधण्यात आले असून त्यापैकी ५ लाख मोबाईल मालकांना परत करण्यात आले, अशी माहिती देखील शिंदे यांनी दिली.

**<><><><><>**

वंदे भारत रेल्वे सुविधा अल्पावधीतच देशातल्या सर्व राज्यांमधे पोहोचल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. देशभरात सध्या १४४ वंदे भारत गाड्या रेल्वेमार्गांवरुन धावत असून या गाड्यांना मिळणारा प्रतिसाद चांगला आहे. या गाड्यांना वाढती मागणी आहे, असं त्यांनी सांगितलं. २०१४-१५ च्या तुलनेत रेल्वे अपघातांमध्ये ७७ टक्के घट झाल्याचं  वैष्णव यांनी दुसऱ्या एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं ते म्हणाले की, २०१४-१५ मध्ये रेल्वे अपघातांची संख्या १३५ होती. २०२४-२५ मध्ये ती ३१ वर आली.

कवच ४.० ही रेल्वे सुरक्षा प्रणाली कोटा-मथुरा विभागात कार्यान्वित होण्यासाठी सज्ज असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मणीपूरमधे राष्ट्रपती राजवट आणखी सहा महिने वाढवण्याच्या प्रस्तावाला लोकसभेनं आज मंजुरी दिली. हा वाढीव कालावधी येत्या १३ ऑगस्टपासून सुरु होईल. १३ फेब्रुवारीपासून मणिपूरमधे राष्ट्रपती राजवट लागू आहे, ती वाढवण्याचा प्रस्ताव केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी मांडला.

**<><><><><>**

भगवान गौतम बुद्धांचे पवित्र पिप्राहवा अवशेष १२७ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर भारतात परत आणण्यात मिळालेल्या यशाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. हे अवशेष १८९८ साली सापडले होते, मात्र वसाहतवादाच्या काळात ते भारतातून बाहेर नेण्यात आले, असं मोदी यांनी नमूद केलं. या वर्षाच्या सुरुवातीला हे अवशेष आंतरराष्ट्रीय लिलावात दिसले, तेव्हा ते परत मिळवण्यासाठी सरकारने तातडीनं पावलं उचलली, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

नासा-इस्रो सिंथेटिक अपर्चर रडार - निसार उपग्रहाचं उड्डाण आज यशस्वी झालं. आंध्रप्रदेशातल्या श्रीहरिकोटा इथं सतीश धवन उड्डाण तळावरुन जीएसएलव्ही - एफ सिक्सटीन अग्निबाणाबरोबर संध्याकाळी ५ वाजून ४० मिनिटांनी हा उपग्रह यशस्वीपणे अंतराळात झेपावला आणि त्यानंतर १९ मिनिटांनी तो निर्धारित कक्षेत स्थिरावला. भारतीय अंतराळ संशोधन संस्था इसरोने समाजमाध्यमांवर ही माहिती दिली. निसार ही अमेरिकेबरोबरची संयुक्त मोहीम असून या उपग्रहाद्वारे पृथ्वीची अधिक स्पष्ट आणि नेमकी छायाचित्रं मिळू शकतील. ही मोहीम यशस्वी झाल्यानंतर केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी इसरोच्या पूर्ण चमूचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के कर लादण्याचा निर्णय अमेरिकेनं घेतला आहे. १ ऑगस्टपासून हे दर लागू होतील, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज समाज माध्यमांवर जाहीर केलं. रशियाकडून कच्चं तेल खरेदी करत असल्याबद्दल अतिरीक्त दंड लादण्याचा इशाराही त्यांनी दिल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. युक्रेनसोबत रशियानं ७ ऑगस्टपूर्वी शस्त्रसंधी केली नाही रशियाकडून कच्चं तेल खरेदी करणाऱ्यांवर १०० टक्के दरानं अतिरीक्त कर लादण्याचा इशारा त्यांनी यापूर्वीच दिला आहे. जपान आणि युरोपियन महासंघावर १५ टक्के, फिलिपिन्स आणि इंडोनेशियावर १९ टक्के, बांग्लादेशावर ३५ टक्के, थायलंडवर ३६ टक्के आणि मलेशियावर २५ टक्के दरानं कर लादण्याचा निर्णय अमेरिकनं जाहीर केला आहे.

**<><><><><>**

नायजेरियामधे अदामावा राज्यात अचानक आलेल्या पुरात किमान २३ जणांचा मृत्यू झाला असून ११ जण बेपत्ता आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या मानवतावादी

समन्वय कार्यालयाने ही माहिती दिली. योला परिसरात आलेल्या या पुरात साडेपाच हजाराहून जास्त लोक बेघर झाले आहेत. मुसळधार पाऊस आणि पाण्याचा निचरा करण्याच्या यंत्रणेचा अभाव यामुळे गेल्या मे महिन्यापासून वेगवेगळ्या वेळी आलेल्या पुरात २०० हून जास्त लोक दगावले आहेत.

**//<><><><><>//**